# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 01/06/2023 (गुरूवार) सायंकाळ

---

## गैरकायदयाची मंडळी

पो.स्टे. काटोल :– अंतर्गत १२ कि. मी. अंतरावरील ढवळापुर काटोल येथे दिनांक ३१/५/२०२३ चे १८/०० वा. ते १८/२० वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ. मिना सचीन दखने, वय ३२ वर्षे, रा. वार्ड क्र. ४ खापरखेडा ता. सावनेर यातील ही मौजा. ढवळापुर येथे आपल्या बहिणीला भेटण्याकरीता गेली असता फिर्यादीची लहान बहीन कु. अनुसया उर्फ मुन्नी ही घरी हजर नसल्याने फिर्यादी ही दारामध्ये बसली असता यातील **आरोपी नामे– १) मुकेश ईश्वर वानखेडे २) रवी लालजी प्रधान ३) किरन केशवराव कांबळे ४) सोनु रवी प्रधान ५) मनोज सुधाकर कांबळे ६) लालजी घोंगडु प्रधान ७) महिला आरोपी सर्व रा. ढवळापुर काटोल** यांनी संगणमत करून फिर्यादी हिला लोखंडी रॉडने मारून जखमी केले तसेच ओढणीच्या दुपट्टयाने गळा पिचकला तेवढयात फिर्यादीची बहिण ही वाचविण्यास धावली असता यातील आरोपी याने त्यांचे कपडे फाडले व त्यांना धक्काबुकी केली तसेच फिर्यादी व तिच्या बहिणीला अश्लिल शब्दात शिव्या दिल्या.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीतांविरुध्द कलम १४३, १४७, १४९, ३२४, २९४, ५०४, ५०६ भा.द.वि कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास स.फौ. लक्ष्मण रूडे ब. नं. १६४६ पो.स्टे काटोल मो. नं. ९९२३३५२६४६ हे करीत आहे.

## घरफोडी

१) पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत ०३ किमी अंतरावर मौजा बाळकृष्ण नगर परसोडी रोड उमरेड येथे दिनांक ३०/०५/२०२३ चे २०.०० वा. ते दिनांक ३१/०५/२०२३ चे ००.१५ वा. दरम्यान फिर्यादी नामे– शैलेश विजय वडलावार, वय ४५ वर्ष, रा. मौजा बाळकृष्ण नगर परसोडी रोड उमरेड उत्तम सातव यांचे घरी किरायाने हे घराला मुख्य दरवाजाला कुलुप लावुन बाहेर कार्यक्रमा करीता गेले असता कार्यक्रम करून घरी परत आले तेव्हा त्यांना घराचे मुख्य दाराचे कुलुप तोडलेल्या स्थितीत दिसले असता पत्नी सह बेडरूम मध्ये जावुन आतील आलमारीची पाहणी केली असता चोरीस गेलेला मुद्देमाल १) सोन्याचे मंगळसुत्र ३.५ तोळे किंमती अंदाजे १,०५,०००/– रू २) सोन्याचे कानातले रिंग ५ ग्रॅम किंमती १५०००/– रू ३) सोन्याचे लॉकेट ८ ग्रॅम किंमती अंदाजे २४०००/– रू. ४. सोन्याची नथ २ ग्रॅम किंमती ६०००/– रू ५) सोन्याचे डोरल्याचे मनी ५ ग्रॅम किंमती १५०००/– रू. ६) सोन्याचे कानातले टॉप्स ३ ग्रॅम ९०००/– रू. ७) चांदीचे जोडवे १ तोळा किंमती १०००/– रू. व नगदी ७०००/– असा एकुण १,८२,०००/– रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात इसमाने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक पांडे मो. नं. ९७६३७०७९८४ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. नरखेड** :— अंतर्गत २७ किमी अंतरावर मौजा मोहगाव भदाडे येथे दिनांक ३०/०५/२०२३ चे २३:०० वा. ते ३१/०५/२०२३ चे ११:३० वा. पर्यंत फिर्यादी नामे— माधवराव जागोजी घटे, वय ५८ वर्ष, रा. मोहगाव भदाडे हा त्याचे पत्नीसह शेतात गेला असता कोणीतरी अज्ञात चोराने फिर्यादीचे राहते घराचे दाराचे कुलूप तोडून आत प्रवेश करून घराचे हॉलमधील सॅमसंग कंपणीची LED टी.व्ही. किंमती अंदाजे १६०००/— रू व किचनमधील गॅसची शेगडी किंमती अंदाजे १०००/— रू. असा एकूण १७०००/— रूपयाचा मुद्देमाल चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. नरखेड येथे आरोपीविरुध्द कलम ३८०, ४५४, ४५७ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक राम ढगे हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**